


दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217
वर्ष ३ रे अंक : ३९१ वा मंगळवार दि १६ जून २०२६ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# उबाठाचे सात खासदार फुटण्याच्या चर्चा, धोका टाळण्यासाठी ठाकरेंचा प्लॅन...

**वृत्तसंस्था-मुंबई**

: शिवसेना (उबाठा) पक्षात पुन्हा फूट पडण्याची चर्चा असताना धोका टाळण्यासाठी पक्षाने बैठकसत्र सुरू केले आहे. खासदारांची नुकतीच बैठक घेतलेल्या ङ्गउबाठाफ्ने येत्या २२ जूनला आमदारांची बैठक बोलावली आहे. दरम्यान, ङ्गउबाठाफ्चा कोणताही खासदार आमच्या संपर्कात नाही, असे शिवसेनेचे नेते आणि मंत्री उदय सामंत यांनी सोमवारी स्पष्ट केले. पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसच्या २० खासदारांनी स्वतंत्र गट निर्माण केल्याने देशाच्या राजकारणात खळबळ उडाली आहे. त्यातच ङ्गउबाठाफ्चे खासदारही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संपर्कात असल्याची चर्चा सुरू आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी पक्षाच्या खासदारांची नुकतीच बैठक घेतली. त्यात नऊपैकी चारच खासदार प्रत्यक्षात उपस्थित राहिले, तर अन्य ऑनलाइन सहभागी झाले, असे सांगण्यात आले. त्यामुळे ङ्गऑपरेशन टायगरफ्च्या चर्चा रंगली असतानाच सोमवारी, २२ जून रोजी दुपारी ४ वाजता मंत्रालयासमोरील शिवालय येथे शिवसेना (उबाठा) विधिमंडळ पक्षाच्या विधानसभा व विधान परिषदेच्या सर्व सदस्यांची बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीस पक्षप्रमुख उद्धव ठाकरे मार्गदर्शन करणार आहेत. याबाबतचे पत्रच पक्षाचे मुख्य प्रतोद सुनील प्रभू यांच्या सहीने काढण्यात आले आहे. दरम्यान, ङ्गशिवसेना उबाठा पक्षाच्या कोणत्याही खासदारासोबत आमचा संपर्क नाही. या खासदारांसोबत अशी कोणतीही बैठक झालेली नाही. आम्हाला ङ्गऑपरेशन टायगरफ्ची गरज नाही. संजय राऊत यांच्या संयमाला दाद द्यावी लागेल. त्यांनी उबाठाचे अस्तित्व टिकवले आहेफ, असा टोला मंत्री उदय सामंत यांनी लगावला. संजय राऊत शरण गेले नाहीत, खमक्या नेता आज कार्यक्रमाला आला आहे, कामगाराला न्याय देणारी आमची भारतीय कामगार सेना आहेफ, असे सांगत खासदार अरविंद सावंत यांनी सोमवारी खासदार संजय राऊत यांचे कौतुक केले. तसेच, ङ्गशिवसेना पक्ष तसेच चिन्ह हे लोक घेऊन गेले, अजून न्याय मिळाला नाही, ४ वर्षे झाली. एखादा गट पक्षातून फुटतो, त्याला दुसऱ्या पक्षात विलीन व्हावे लागते, जे आता बंगालमध्ये झाले आहे. परंतु, येथे यांनी आमचीच शिवसेना नेली, पण ते दुसऱ्या पक्षात विलीन झाले नाहीतफ, असे म्हणत सावंत यांनी पुन्हा शिवसेना पक्ष आणि चिन्हाचा मुद्दा उपस्थित केला. पक्षाच्या कार्यकर्त्यांशी संवाद न ठेवता फ ेसबुक लाइव्ह करणाऱ्या उद्धव ठाकरे यांच्या अहंकारामुळेच उबाठा पक्ष बुडेल, असा दावा शिवसेनेचे उपनेते व प्रवक्ते संजय निरुपम यांनी सोमवारी मुंबईत केला. अहंकारामुळे तृणमूल पक्ष फुटला तशीच परिस्थिती उबाठाची झाली असल्याचेही ते म्हणाले. मुंबईतील बाळासाहेब भवन येथे आयोजित



पत्रकार परिषदेत निरुपम यांनी ही टीका केली. उबाठाच्या खासदारांनी उघडपणे त्यांच्या पक्षाच्या नेतृत्वावर आरोप केला होता. उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे खासदारांना भेटत नाही, अशी नाराजी खासदारांनी काही दिवसांपूर्वी बोलून दाखवली होती. नुकत्याच पार पडलेल्या नगर परिषदा, महापालिका निवडणुकीत उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांनी कार्यकर्त्यांना वाऱ्यावर सोडले आणि प्रचाराला गेले नाहीत. त्यामुळेही ठाकरेंवर खासदार, आमदार आणि पदाधिकारी प्रचंड नाराज आहेत, असा दावा निरुपम यांनी केला

# मुख्यमंत्र्यांच्या आश्वासनानंतर रोहित पवार यांचं उपोषण स्थगित, २२ जूनपासून पावसाळी अधिवेशन, त्याआधी शेतकरी कर्जमाफीबाबत बैठक होणार

**वृत्तसंस्था सोलापूर**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी अखेर आपलं अन्नत्याग आंदोलन स्थगित केलं आहे. त्यांच्या पंढरपूर येथील आंदोलनस्थळी रात्री सव्वा दहा वाजेच्या सुमारास मंत्री गिरीश महाजन दाखल झाले. गिरीश महाजन यांची संकटमोचक नेते अशी ख्याती आहे. त्यामुळे रोहित पवार यांचं अन्नत्याग आंदोलन थांबवण्यात त्यांना यश येतं का? ते पाहणं महत्त्वाचं होतं. त्यात त्यांना यश आलं आहे. रोहित पवार यांच्या अन्नत्याग आंदोलनाचा आज तिसरा दिवस होता. तीन दिवसांपासून उपोषण केल्यामुळे रोहित पवार यांची आज प्रकृती ढासळली. त्यांच्या शरीरातील बीपी आणि शुगर कमी झाल्याची माहिती डॉक्टरांनी दिली होती. तसेच डॉक्टरांनी रोहित पवारांना सलाईन लावण्याची विनंती केली. पण रोहित पवारांनी मंत्री गिरीश महाजन आल्यानंतर सलाईन घेऊ, अशी भूमिका घेतली. अखेर रात्री सव्वा दहा वाजेच्या सुमारास गिरीश महाजन आंदोलनस्थळी दाखल झाले. यावेळी सकारात्मक चर्चा झाल्यानंतर रोहित पवारांनी उपोषण सोडलं. मंत्री गिरीश महाजन यांचा दुपारी भेटीसाठी येत असल्याचा मेसेज रोहित पवारांना आला होता. त्यांनतर रात्री सव्वा दहा वाजेच्या सुमारास दाखल झाले. दरम्यान, सोलापूरच्या माळशिरस येथे पीकअप विहिरीत कोसळल्याने आठ जणांचा मृत्यू झाल्याची घटना घडली. या घटनेतील जखमींच्या भेटीसाठी मंत्री गिरीश महाजन आधी माळशिरसला गेले होते. त्यानंतर ते रोहित पवार यांच्या आंदोलनस्थळी दाखल झाले. यावेळी गिरीश महाजन आणि रोहित पवार यांच्यात चर्चा झाली. गिरीश महाजन यांनी चर्चेतून विषय सोडवण्याची विनंती सुरुवातीला केली. यासोबतच मंत्री गिरीश महाजन यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत संपर्क करण्याचा प्रयत्न केला. गिरीश महाजन यांचं मुख्यमंत्र्यांसोबत बोलणं झालं. मुख्यमंत्र्यांनी रोहित पवारांच्या मागणीवर सकारात्मक प्रतिसाद दिला. यानंतर गिरीश महाजन यांच्या विनंतीनंतर रोहित पवार यांनी अन्नत्याग आंदोलन स्थगित करत असल्याची घोषणा केली आहे. गिरीश महाजन यांनी रोहित पवारांना अन्नत्याग आंदोलन करण्याआधी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवणं अपेक्षित होतं, असं म्हटलं. मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन आपली भूमिका मांडली असती तर चर्चेतून मार्ग निघाला असता, असं गिरीश महाजन म्हणाले. गिरीश महाजन यांनी यावेळी मुख्यमंत्र्यांसोबत फोनवर बातचित केली. यानंतर पावसाळी अधिवेशनाच्याआधी या विषयावर आंदोलकांच्या शिष्टमंडळासोबत बैठक होईल. या बैठकीत मार्ग काढला जाईल, असं आश्वासन गिरीश महाजन यांनी दिलं.

# कोटींच्या लाखाची गोष्ट



स्पेसएक्सफ कंपनीच्या समभागांची विक्री आणि त्यांच्या मूल्यवर्धनातून उद्योगपती एलन मस्क यांची संपत्ती एक लाख कोटी डॉलरहून अधिक झाल्याने जगातील पहिले ङ्कट्रिलियनियरफ म्हणून त्यांच्यावर शिक्कामोर्तब झाले आहे. त्यांचे हे यश म्हणजे तंत्रज्ञानाच्या आधारे नवनिर्मिती, बुद्धिमत्ता-संशोधनाला दिलेली कष्टांची जोड, जिद्द, दूरदृष्टी आणि जोखीम पत्करण्याचे धाडस अशा विविध गुणांचा संगम आहे. त्यातूनच जगातील अनेक देशांच्या अर्थव्यवस्थांपेक्षा अधिक संपत्तीचे ते धनी बनले. पारंपरिक विचारांचे ओझे टाकून नव्या मार्गाने केलेल्या वाटचालीत त्यांनी गाठलेला हा टप्पा साऱ्या जगासाठी प्रेरणादायी आहेच; तसेच आकर्षक परताव्याच्या आशेने लाखो गुंतवणूकदारांनी त्यांच्यावर टाकलेला विश्वास, ही या घटनाक्रमातील सर्वांत महत्त्वाची गोष्ट ठरावी. आजवर केवळ विज्ञानकथांमधूनच शोभाव्यात, अशी कृत्रिम प्रज्ञा, विजेवर चालणारी वाहने किंवा अंतराळातील प्रवास आणि वस्ती अशा अनेक बाबी मानवाच्या आवाक्यात येत आहेत. नव्या युगातील बदलांचा कल्पनेपलीकडचा वेग पाहता त्या कोणत्याही क्षणी आपल्या दाराशी येणार आहेत; त्यामुळे या नव्या वास्तवाची दखल केवळ अमेरिकाच नव्हे, तर जगातील प्रत्येकाने घेतली पाहिजे. केवळ एका व्यक्तीच्या यशापुरते त्याचे मोजमाप करता येणार नाही, तर त्यांच्या ङ्कटेस्लाफ, ङ्कस्पेसएक्सफ आणि ङ्कन्यूरलिंकफ या भविष्यकाळातील तंत्रज्ञानाबाबत नागरिकांना किती आशा आहेत, हेच यातून दृगोच्चर होते. अर्थात, एवढ्या प्रचंड संपत्तीचे एका व्यक्तीकडे होणारे केंद्रीकरण आणि जगभरातील विषमता हीसुद्धा बदलत्या काळात धोरणकर्त्यांनी गांभीर्याने विचार करावा, अशीच बाब आहे. ङ्कलक्ष्मीकडे लक्ष्मी जाते,फ तद्वतच थोडे पैसे असलेले लाखो गुंतवणूकदार प्रचंड संपत्ती असलेल्यांकडे आपला पैसा सोपवतात आणि त्या भांडवलातून ही संपन्न मंडळी गुंतवणूकदारांना परतावा देऊन आपल्याही संपत्तीमध्ये अब्जा-अब्जांनी भर घालतात, हे पूर्वीपासून आढळते. मात्र, केवळ एलन मस्कच नव्हे, तर वर्तमान जगातील पहिल्या दहा श्रीमंतांपैकी बहुतेक सर्व नव्या तंत्रज्ञानावर स्वार झालेल्या उद्योगांचे धनी आहेत. मस्क हेसुद्धा विजेवरील वाहने, उपग्रह आणि कृत्रिम प्रज्ञा या नव्या क्षेत्रात भ्रमंती करणारेच आहेत. मळलेल्या वाटांवर यश मिळवणाऱ्यांच्या पाठीमागे धावण्याऐवजी त्यांनी अशक्यप्राय स्वप्ने पाहिली. नव्या कल्पना मांडून न थांबता त्यांचा अथक पाठपुरावा केला. कधी काळी तेही अपयशाच्या कडेलोटापर्यंत पोहोचले होते; पण त्यांचा नवनिर्मितीचा ध्यास कायम राहिला. त्यातूनच व्यवस्थापनशास्त्रातील ङ्कब्लू ओशन थिअरीफ्नुसार स्पर्धेपलीकडे जाऊन नव्या क्षितिजांवर विहार केला आणि त्यातूनच आपले साम्राज्य उभे केले, हे ध्यानात घ्यावे लागेल. आता ङ्कस्पेसएक्सफच्या ङ्कआयपीओफ्तून उभारलेले भांडवलही ते ङ्कऑर्बिटल डेटा सेंटरफ, चंद्रावरील कारखाना आणि मंगळ मोहीम अशा नव्या उपक्रमांतच गुंतवणार आहेत. मानवी बुद्धीच्या उड्डाणांना अंतराळाच्याही मर्यादा राहिलेल्या नाहीत, याचेच हे द्योतक म्हणावे लागेल. बदलत्या काळात नव्या कल्पना आणि संशोधनाचे महत्त्व यातून लक्षात येते. भारतातील सद्यस्थिती पाहता, संशोधन आणि विकासामध्ये सरकार आणि उद्योगजगतालाही मोठी मजल मारावी लागणार आहे. सक्षम मनुष्यबळ घडवणे,ही त्याची पहिली पायरी आहे. त्यासाठी शिक्षण आणि त्यातही मूलभूत विज्ञान-तंत्रज्ञानाच्या शिक्षणावर अधिकाधिक भर द्यावा लागेल. करियरच्या पारंपरिक वाटांबरोबरच कृत्रिम बुद्धिमत्ता, अंतराळसंशोधन, सेमीकंडक्टर अशी नवी क्षेत्रे काबीज करण्यासाठी नव्या पिढीला उद्युक्त करावे लागेल. मस्क यांनी गाठलेले हे स्थान कौतुकास्पद आहेच; मात्र विख्यात लेखक मारिओ पुझो यांनी ङ्कगॉडफादरफ कादंबरीत अमर केलेल्या ङ्कप्रत्येक नेत्रदीपक उत्कर्षामागे काही गुन्हा असतो,फया वचनाप्रमाणे मस्क यांच्या यशालाही नियमांचे उल्लंघन, गैरप्रकार, कृष्णवर्णीयांशी भेदभाव आणि युद्धांमधील संशयास्पद भूमिका अशा कृत्यांची काळी किनार आहेच. असे धनाढ्य विविध देशांच्या धोरणांवर दबाव-प्रभाव टाकत असून, जागतिक राजकारणातील त्यांच्या हस्तक्षेपाचे अनुभवही नवे नाहीत. अनेक देशांच्या ङ्कजीडीपीफपेक्षा अधिक संपत्तीचे केंद्रीकरण आणि निर्माण होणारी भयानक विषमता अशा विविध चिंता अनाठायी नक्कीच नाहीत.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# भारताच्या डीएनएमध्येच नाविन्यता : मोदी

## फ्रान्समधील नीस येथे 'भारत इनोव्हेट्सचे' उद्घाटन..

■ नीस/वृत्तसंस्था

भारताच्या तरुणांची मानसिकता नवीन आहे, जी संपूर्ण मानवतेचा विचार करते. भारत शाश्वत भविष्यासाठी आणि संपूर्ण जगासाठी नवनिर्मिती करत आहे. नाविन्यता ही भारताच्या डीएनएमध्येच आहे. हजारो वर्षांपासून भारताने वैद्यकशास्त्र, योग, गणित आणि विज्ञानातील आपल्या योगदानातून मानवतेच्या प्रगतीला आकार दिला आहे," असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी केले. फ्रान्समधील नीस येथे फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्या उपस्थितीत 'भारत इनोव्हेट्स'च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.




यावेळी पंतप्रधान मोदी म्हणाले की, भारत जागतिक इनोव्हेशनमधील एक उगवती शक्ती आहे. भारत आता तंत्रज्ञानाचा केवळ ग्राहक न राहता उपाय पुरवणारा देश बनत आहे. भारत एक जागतिक इनोव्हेशन सोल्यूशन्स हब म्हणून उदयास येत आहे. देश तरुण आणि तळागाळातील परिसंस्थेला पाठबळ देत नाविन्यतेची सांगड सर्वसमावेशकता आणि शाश्वततेशी घालत आहे. पंतप्रधान मोदींनी भारताच्या तरुणांचे कौतुक केले. तरुण केवळ संकुचित व्यावसायिक हितसंबंधांसाठी काम न करता मानवतेच्या कल्याणासाठी उपाय शोधत आहेत, असे ते म्हणाले. "भारताच्या तरुणांची मानसिकता नवीन आहे, जी संपूर्ण मानवतेचा विचार करते," असे मोदी म्हणाले. भारताच्या प्रयत्नांच्या केंद्रस्थानी 'शाश्वतता' असून भारत जगासाठी नवनवीन शोध लावत आहे, यावर पंतप्रधानांनी पुन्हा एकदा भर दिला. भारत शाश्वत भविष्यासाठी आणि संपूर्ण जगासाठी इनोव्हेशन करतो," असे ते म्हणाले.

इनोव्हेशनला चालना देण्यासाठी केलेल्या सुधारणांमुळेच 'भारताची प्रतिमा 'तंत्रज्ञान स्वीकारणारा देश' वरून आता 'तंत्रज्ञान पुरवणारा देश' अशी बदलली आहे, असे स्पष्ट करत भारत ही जगातील तिसरी सर्वात मोठी स्टार्टअप इकोसिस्टम होत आहे. तुम्हाला येथे १००-१२५ स्टार्टअप्स दिसत असतील. पण भारताकडे अशा २ लाखांहून अधिक स्टार्टअप्सचा पूल आहे. हे सर्व स्टार्टअप्स मिळून भारतीय आणि जागतिक अर्थव्यवस्थेच्या वाढीमध्ये योगदान देत आहेत," असे ते म्हणाले.

### 'मेक इन इंडिया' उपक्रमाला फ्रान्सचा पाठिंबा : मॅक्रॉन

■ कार्यक्रमाला संबोधित करताना फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी भारताच्या 'मेक इन इंडिया' उपक्रमाला फ्रान्सचा पाठिंबा दर्शवला. या कार्यक्रमांतर्गत फ्रान्सने विविध क्षेत्रांमध्ये भारताबरोबर भागीदारी केल्याचे त्यांनी सांगितले. भारताचा "इनोव्हेशनचा देश" असा गौरव करत मॅक्रॉन म्हणाले की, आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि क्लायमेट ॲक्शन यांसारख्या गंभीर क्षेत्रांमध्ये दोन्ही देशांमध्ये मजबूत भागीदारी आहे. स्मॉल मॉड्युलर रिॲक्टर्सच्या विकासासह नागरी अणुऊर्जा क्षेत्रात सहकार्य वाढवण्याच्या संभाव्यतेवरही त्यांनी भर दिला.

# शंभरावे अ.भा.मराठी साहित्य संमेलन पुण्यात

■ पुणे/वृत्तसंस्था

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे ऐतिहासिक शंभरावे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन पुण्यातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रांगणात २८ ते ३१ जानेवारी २०२७ या कालावधीत आयोजित करण्यात येणार आहे. हे संमेलन चार दिवसांचे असून ते ऐतिहासिक आणि भव्य स्वरूपात पार पडेल, अशी माहिती महामंडळाचे अध्यक्ष योगेश सोमण यांनी रविवारी पत्रकार परिषदेत दिली. संमेलनाचे संयोजक, समर्थ युवा फाऊंडेशनचे अध्यक्ष राजेश पांडे, मसापाच्या प्रमुख कार्यवाह डॉ. स्वाती महाळंक, कोषाध्यक्ष प्रदीप निफाडकर उपस्थित होते.

महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक रविवारी पुण्यात आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत संमेलनाचे स्थळ आणि तारखा याबाबत सर्व सभासदांनी एकमताने मंजुरी दिली. यापूर्वी दि. १३ जून रोजी स्थळ निवड समितीने एस.पी. महाविद्यालय, फर्ग्युसन महाविद्यालय आणि पुणे विद्यापीठ परिसराची पाहणी केली होती.

या पाहणीमध्ये योगेश सोमण, उपाध्यक्ष पुरुषोत्तम सप्रे, कार्यवाह स्वाती महाळंक, कोषाध्यक्ष प्रदीप निफाडकर, डॉ. रामचंद्र काळुंखे, प्रा. प्रतिभा सराफ आणि लखनसिंह कटरे सहभागी झाले होते. बैठकीत विविध पैलूंवर सविस्तर चर्चा करण्यात आली. संमेलनासाठी आवश्यक असलेले भव्य प्रांगण, प्रशस्त पार्किंग व्यवस्था तसेच विद्यापीठातील सुमारे दीड हजार प्राध्यापक व कर्मचारी संमेलनाच्या यशासाठी सहकार्य करतील, अशी ग्वाही कुलगुरू सुरेश गोसावी यांनी दिल्याचे अध्यक्षांनी सांगितले.



### नांदी शंभराव्या साहित्य संमेलानाची

■ नांदी शंभराव्या साहित्य संमेलानाची या उपक्रमातून पुणे, मुंबई वगळता जेथे साहित्य संमेलने झाली आहेत, अशा महाराष्ट्रातील ४८ ठिकाणांसह महाराष्ट्राच्या विविध भागात संमेलनपूर्व ९९ साहित्यिक उपक्रमांद्वारे शंभराव्या साहित्य संमेलनाची नांदी होणार आहे. १५ ऑगस्ट ते १५ जानेवारी या कालावधीत हे साहित्यिक उपक्रम राबविले जाणार आहेत.

# सरकारने तुकाराम मुंढेंच्या बदलीच्या भानगडीत पडू नये : मनोज जरांगे पाटील

■ धाराशिव/वृत्तसंस्था

आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे हे खूप चांगले काम करत आहेत. त्यांनी सुरू केलेल्या भेसळविरोधी मोहिमेमुळे सामान्यांचे जीवन सुधारेल आणि शेतकऱ्यांच्या दुधाला चांगला भाव मिळेल. त्यामुळे सरकारने तुकाराम मुंढे यांच्या बदलीच्या भानगडीत पडू नये, अन्यथा आम्ही सरकारच्या मागे लागू," असा कडक इशारा मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारला दिला आहे.

कळंब मार्गे कोल्हापूरला जात असताना त्यांनी रविवारी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, तुकाराम मुंढे यांच्या धडक कारवाईमुळे त्यांच्या बदलीसाठी राजकीय हालचाली सुरू असल्याच्या चर्चा कानावर येत आहे. "मुंढे साहेब प्रामाणिकपणे काम करत आहेत. भेसळ रोखल्यामुळे शेतकऱ्यांचा फायदा होणार आहे. अशा कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याची जर राजकीय दबावापोटी बदली करण्याचा प्रयत्न झाला, तर सरकारला त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील," असे जरांगे यांनी स्पष्ट केले. कुणबी नोंदींच्या संदर्भातील कोल्हापूर आणि सातारा गॅझेट लागू करण्याबाबत जरांगे-पाटील यांनी सरकारवर विश्वास व्यक्त केला. "या गॅझेटसाठी सरकार पुन्हा आंदोलनाची वेळ येऊ देणार नाही. आता फक्त औपचारिकता बाकी असून सरकार हे गॅझेट लागू करेल," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



# 'पांढऱ्या पट्ट्यांवरून' राजकारण करणाऱ्यांना मते मिळत नाहीत : फडणवीस




मुंबई/वृत्तसंस्था

जैन धर्मगुरू आणि साध्वींच्या सोयीसाठी मुंबईतील विविध रस्त्यांवर मारण्यात आलेल्या 'पांढऱ्या पट्ट्यांवरून' आता राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. दादर पाठोपाठ आता गिरगाव आणि घाटकोपरमध्येही मनसे आणि शिवसेना ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी आक्रमक पवित्रा घेत पट्ट्यांवर काळा रंग फासण्यास सुरुवात केली आहे. या वाढत्या वादावर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रथमच स्पष्ट शब्दांत भाष्य केले असून, "प्रत्येक गोष्टीला वादात ओढून राजकारण केल्याने कधीच मते मिळत नाहीत," असा सणसणीत टोला त्यांनी मनसेला लगावला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी मुंबईतील वर्सोवा ते भाईंदर नॉर्थ कोस्टल रोडची पाहणी केली. यावेळी माध्यमांशी संवाद साधला असता, सदर वादावर आपली भूमिका स्पष्ट करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, "कोणत्याही राजकीय फायद्यासाठी दोन समाजांना एकमेकांसमोर उभे करणे आणि त्यांच्यात तेढ निर्माण करणे पूर्णपणे चुकीचे आहे." "एखाद्या समाजाची एखादी परंपरा असेल, तर ती परंपरा त्यांनी सांभाळली पाहिजे आणि इतर समाजानेही त्यांच्या परंपरेचा आदर राखला पाहिजे. त्याचप्रमाणे, ज्यांची ती परंपरा आहे, त्यांनी इतर समाजाला त्रास होणार नाही याची काळजी घेत त्यांचा आदर केला पाहिजे. आपल्या संस्कृतीत एकमेकांचा आदर करणे हेच सर्वात महत्त्वाचे आहे," असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. या पार्श्वभूमीवर मुंबईतील काही भागांमध्ये पोलिसांनी अतिरिक्त बंदोबस्त तैनात केला असून, कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे. पांढऱ्या पट्ट्यांच्या मुद्द्यावरून विविध राजकीय पक्षांकडून परस्परविरोधी भूमिका मांडल्या जात असताना, सामाजिक आणि धार्मिक संघटनांनी मात्र संयम बाळगण्याचे आवाहन केले आहे. या वादामुळे धार्मिक परंपरा, सार्वजनिक सुविधा आणि नागरिकांच्या दैनंदिन हालचाली यांच्यात समतोल कसा साधायचा, यावरही चर्चा सुरू झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी राज्यातील सामाजिक सलोखा टिकवून ठेवण्याचे महत्त्व अधोरेखित केले. "महाराष्ट्राची ओळख ही सर्व धर्म, पंथ आणि समाजघटकांना समान आदर देणाऱ्या राज्याची आहे. त्यामुळे कोणत्याही विषयाला अनावश्यक धार्मिक किंवा सामाजिक रंग देणे योग्य नाही," असेही त्यांनी स्पष्ट केले. तसेच, प्रशासनाने सर्व संबंधित घटकांशी संवाद साधून मार्ग काढावा आणि कोणालाही त्रास होणार नाही अशा पद्धतीने प्रश्न सोडवावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. दरम्यान, या प्रकरणावरून राजकीय आरोप-प्रत्यारोप सुरू असले तरी परिस्थिती शांततापूर्ण ठेवण्यासाठी प्रशासन आणि पोलीस यंत्रणा सतर्क असल्याचे सांगितले जात आहे.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मोफत धान्याचा काळाबाजार; 17 लाखांचा धान्यसाठ्यासह मुद्देमाल जप्त, तिघांना अटक

■ छत्रपती संभाजीनगर/वृत्तसंस्था

रेशनिंगसाठी तसेच महिला व बालकल्याण विभागातील शालेय पोषण आहाराअंतर्गत लहान मुलांसाठी तसेच गरोदर व स्तनदा माता यांच्यासाठी मोफत वाटपासाठी असलेला धान्यसाठा गुन्हे शाखेच्या पोलिसांनी जप्त केला. ही कारवाई १३ जून रोजी सकाळी ११.३० ते १३ जून रोजी सायंकाळी ६.४० वाजेच्या दरम्यान किराडपुरा भागातील एमआर फंक्शन ऑल येथे करण्यात आली.या प्रकरणात पोलिसांनी समीर कुरेशी (रा. चिकलठाणा), फरदीन गणी पठाण (रा. चिकलठाणा) आणि फहाद लईक शुत्तारी (रा. किराडपुरा) या तिघांना ताब्यात घेतले. या प्रकरणात पोलिस निरीक्षक गजानन कल्याणकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, १२ जून रोजी रात्री १० वाजेच्या दरम्यान जिन्सी पोलिस ठाण्याच्या हद्दीत एमआर फंक्शन हॉलच्या जवळ एकागोडावूनमध्ये कलीम छोटू कुरेशी याने रेशनिंगचे धान्यांचा साठा



करून ठेवला आहे. त्याचे नातेवाईक समीर कुरेशी, आवेज कुरेशी आणि फहाद शुत्तारी हे रेशनिंगचे धान्य काळा बाजारात विक्रीसाठी लोड करून घेऊन जाणार आहेत.या माहितीच्या आधारे गुन्हे शाखेच्या पथकाने शनिवारी (१३ जून) साडेअकरा वाजता वाजता छापा टाकला. या छाप्यात पोलिसांनी रेशन दुकानातील अंत्योदय योजनेतील लाभार्थ्यांना देण्यात येणारे एक किलो वजनाचे साडेचार हजार रुपये किमतीचे १४५ साखर पॉकिट, चार लाख ३९ हजार ८३० रुपयांचे ३६२ गोण्या, ७५ हजार ६०० रुपयांचे ६० गोण्या गहू, साडेचार हजार रुपयांच्या तीन गोण्या ज्वारी, ३६ हजार २७० रुपये किमतीच्या ६२ गोण्या मका, पाच हजार रुपये किमतीचा वजन काटा, नऊ हजार ६०० रुपयांचे शंभर लिटर डिझेल आणि दहा लाख रुपयांचे आयशर ट्रक (एमएच १८ बीएच ७७२०) असा एकूण १५ लाख ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.या प्रकरणी जिल्हा सहायक पुरवठा अधिकारी संदीप शिंदे यांच्या तक्रारीवरून समीर बाबर कुरेशी, फहाद लईक शुत्तारी, फरदीन गणी पठाण; तसेच आवेज कुरेशी आणि कलीम छोटू कुरेशी आणि त्याच्या साथीदारांच्या विरोधात जिन्सी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात आवेज कुरेशी आणि कलीम छोटू कुरेशी सह अन्य साथीदारांचा पोलिसांकडून शोध सुरूआहे.कारवाई करताना याच भागात अन्य एका खोलीत महिला व बाल कल्याण विकास प्रकल्पाअंतर्गत अंगणवाडीतील सहा महिने ते तीन वर्षे वयाच्या मुलांसाठी; तसेच गरोदर व स्तनदा माता यांना त्यांची शारीरिक झीज भरून काढण्यासाठी महाराष्ट्र सरकारकडून एनर्जी डेन्स तूरडाळ खिचडी प्रीमिक्स व एनर्जी डेन्स मूगडाळ खिचडी प्रीमिक्स; तसेच मल्टिमिक्स सीरियल एंड प्रोटिन्स प्रीमिक्स आणि मल्टिमिक्स सीरियल्स एंड प्रोटिन्स प्रीमिक्स मोफत देण्यात येते. हे सर्व पदार्थ पॅकिंग फोडून गोण्यांमध्ये भरून विकण्यात आले.

ही कारवाई गुन्हे शाखेचे पोलिस उपआयुक्त प्रशांत मोहिते, सहायक पोलिस आयुक्त अशोक राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक गजानन कल्याणकर, प्रवीण पाथरकर, दिशेन बन, दीप तायडे, प्रदीप दंडवते, योगेश नवसारे, विजय निकम, विनोद परदेशी, राहुल बंगाळे, जालिंदर गोरे, अरुण भिसे, दिनकर आवारे, अभिषेक बाठे, सागर शेडे, माया माळी, मनीषा नरोडे, संदीप शिंदे व महिला बालकल्याण विकास प्रकल्प अधिकारी गणेश पुंगळे यांनी केली.

## कराडमध्ये सौंदर्य प्रसाधनांवर कारवाई

■ मुंबई/वृत्तसंस्था

अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांची बेकायदेशीर औषधांच्या कारवाई पाठोपाठ आता Misbranded सौंदर्य प्रसाधनांवरही कारवाईला सुरुवात झाली आहे. अन्न आणि औषध प्रशासनाने सातारा जिल्ह्यातील कराड येथे छापा टाकत तब्बल 29.45 लाखांचा साठा जप्त केला आहे. तसेच मुंबईत 3.96 लाखांची विनापरवाना सौंदर्यप्रसाधने, कच्चा माल व उत्पादनासाठी वापरण्यात येणारी यंत्रसामग्री जप्त करण्यात आली आहे. मुंबई आणि सातारा या दोन्ही ठिकाणी एकूण 34.61 लाखांच्या किमतीच्या सौंदर्य प्रसाधने साठ्यावर कारवाई करण्यात आली आहे.अन्न व औषध प्रशासनाने ग्राहकांच्या आरोग्याच्या संरक्षणासाठी राज्यातील विविध ठिकाणी केलेल्या कारवाईत नियमानुसार तपशील नसलेली (Misbranded) सौंदर्यप्रसाधने तसेच भ्रामक दावे व विनापरवाना सौंदर्यप्रसाधनांचे उत्पादन करणाऱ्या आस्थापनांविरुद्ध कठोर कारवाई केली आहे. गोपनीय माहितीच्या



आधारे दिनांक 12 जून 2026 रोजी मे. राजलक्ष्मी टेलीकम्युनिकेशन, कराड, जिल्हा सातारा येथे तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान विविध सौंदर्यप्रसाधने विक्रीसाठी साठविलेली आढळून आली. सदर उत्पादनांची पडताळणी केली असता अनेक उत्पादनांच्या बाह्य कार्टनवर बॅच क्रमांक व उत्पादन दिनांक नमूद असताना आतील बाटल्यांवरील लेबलवर बॅच क्रमांक, उत्पादन दिनांक तसेच उत्पादकाचे नाव नमूद नसल्याचे निदर्शनास आले. काही उत्पादनांवर उत्पादन परवाना क्रमांक नमूद असला तरी उत्पादकाची माहिती उपलब्ध नव्हती. त्यामुळे संबंधित सौंदर्यप्रसाधने प्रथमदर्शनी भ्रामक (Misbranded Cosmetics) असल्याचे आढळून आले. या प्रकरणी सुमारे 29,45,375/- किमतीचा साठा प्रतिबंधित करण्यात आला.

## 11 वर्षीय मुलाचा गळफास लागून मृत्यू

**नागपूर :** नागपूरच्या प्रतापनगर पोलिस स्टेशन हद्दीतील शेवाळकर अपार्टमेंटमध्ये घडलेल्या एका दुर्दैवी घटनेत ११ वर्षीय मुलाचा गळफास लागून मृत्यू झाल्याने परिसरात शोककळा पसरली आहे. मल्हार अनमोल रंगारी (वय ११) असे मृत मुलाचे नाव असून, घरात खेळत असताना झालेल्या अपघातामुळे त्याचा मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. मल्हार हा सहाव्या वर्गात शिकत होता. त्याचे वडील खासगी नोकरी करतात, तर आई बँकेत कार्यरत आहे. घटनेच्या वेळी आई-वडील दोघेही कामावर गेले होते. घरात मल्हार, त्याची मोठी बहीण आणि आजी उपस्थित होते.मिळालेल्या माहितीनुसार, दुपारच्या सुमारास मल्हार आणि त्याची बहीण घरात खेळत होते. काही वेळानंतर मल्हार एका खोलीत गेला आणि त्याने दार आतून बंद केले. दुसऱ्या किल्लीच्या साहाय्याने खोलीचे दार उघडले असता मल्हार बेशुद्ध अवस्थेत आढळून आला.

## लाच घेताना RTO सह दोघे अटकेत

■ नागपूर/वृत्तसंस्था

तपासणी नाका पार करण्यासाठी ५०० रुपयांची लाच घेणाऱ्या आरटीओच्या मोटार वाहन निरीक्षकासह दोघांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ अटक केली. महाराष्ट्र-मध्य प्रदेश सीमेवरील खुर्सापार सीमा तपासणी नाका येथे गुरुवारी ही कारवाई करण्यात आली.निरीक्षक साजन शालिग्रामजी शेंडे (वय ५०, रा. निर्मलनगरी, नंदनवन) व प्रवीण बाबुराव गायधने (वय ५०, रा. रघुजीनगर) अशी अटकेतील लाचखोरांची नावे आहेत. शेंडे हे आरटीओच्या ग्रामीण कार्यालयात कार्यरत असून ते प्रवीणच्या माध्यमातून लाच घेत होते. ट्रकचालकाने दिलेल्या तक्रारीवरुन ही कारवाई करण्यात आली.काही दिवसांपूर्वी ट्रकचालक माल घेऊन मध्य प्रदेशात गेला. यावेळी त्याला ५०० रुपयांची लाच मागण्यात आली. १२ जूनला पुन्हा चालकाला मध्य प्रदेशात माल घेऊन जायचे होते. यावेळीही ५०० रुपयांची मागणी करण्यात येणार असल्याची माहिती असल्याने ट्रकचालकाने १० जूनला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अधीक्षक डॉ. दिगंबर प्रधान यांच्याकडे तक्रार केली. प्रधान यांनी चौकशी करून कारवाईचे निर्देश दिले.

अपर अधीक्षक माधुरी बाविस्कर, विजय माहुलकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपअधीक्षक भारती गुरनुले, निरीक्षक मयूर चौरसिया, राजकिरण येवले, हेडकॉन्स्टेबल योगेश साधनकर, कांचन गुलबासे, उपेंद्र आकोतकर, सचिन किन्हेकर व हेडकॉन्स्टेबल विलास इंगळे बुधवारी तक्रारीची पडताळणी केली.प्रवीणच्या माध्यमातून शेंडे हे प्रत्येक ट्रकचालकाकडून ५०० रुपये घेत असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर गुरुवारी एसबीच्या पथकाने खुर्सापार तपासणी नाक्यावर सापळा रचला. तक्रारदार ट्रकचालकाकडून शेंडे यांच्याकरिता प्रवीणने ५०० रुपयांची लाच घेतली. पथकाने आधी प्रवीण व नंतर शेंडे यांना अटक केली. दोघांविरुद्ध केळवद पोलिस ठाण्यात लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल केला. एसीबीचे पथक शेंडे यांच्या घराची झडती घेत असून, वृत्त लिहिपर्यंत कारवाई सुरू होती.

## आईस्क्रीमच्या दुकानांचं शटर डाऊन; भेसळयुक्त अन्नपदार्थांवर कारवाईची मोहीम

■ जालना/वृत्तसंस्था

राज्यातील प्रशासनात सध्या चर्चेचा मुद्दा असलेले आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सूत्रे हाती घेतल्यानं राज्यात अन्नातील भेसळ रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाकडून (FDA) सुरू करण्यात आलेल्या कठोर कारवाईचा परिणाम आता जालना शहरासह ग्रामीण भागातही दिसून येऊ लागला आहे. परिसरातील अनेक ज्यूस सेंटर, आईस्क्रीम पार्लर, शीतपेय विक्री केंद्रे तसेच काही खाद्यपदार्थ विक्रेत्यांनी गेल्या काही दिवसांपासून आपली दुकाने तात्पुरती बंद ठेवल्याचं चित्र पाहायला मिळत आहे.त्यामुळे नागरिकांमध्ये आश्चर्य व्यक्त होत असून बाजारपेठेत विविध चर्चांना उधाण आलं आहे. अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर राज्यभर






भेसळयुक्त अन्नपदार्थांवर कारवाईची मोहीम अधिक तीव्र करण्यात आली आहे. अनेक ठिकाणी अन्नपदार्थांचे नमुने तपासणीसाठी पाठविणे, विनापरवाना व्यवसाय करणाऱ्यांवर कारवाई करणे आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांवर दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. याच पार्श्वभूमीवर राजूर परिसरातील व्यापाऱ्यांमध्येही धास्तीचे वातावरण निर्माण झाल्याचे दिसून येत आहे. उन्हाळ्याच्या हंगामात ज्यूस, आईस्क्रीम आणि थंड पेयांची मोठ्या प्रमाणात विक्री होत असते. या काळात ग्राहकांची संख्या वाढलेली असते. मात्र, गेल्या आठवड्याभरापासून अनेक दुकाने बंद असल्याने नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. काही व्यापाऱ्यांनी संभाव्य तपासणीच्या भीतीने आणि आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी तात्पुरती दुकाने बंद ठेवल्याची चर्चा बाजारपेठेत सुरू आहे.स्थानिक नागरिकांच्या मते, सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने अन्नातील भेसळ रोखणे अत्यंत आवश्यक आहे. अनेकदा कमी दर्जाच्या कच्च्या मालाचा वापर, अस्वच्छ वातावरणात तयार होणारे खाद्यपदार्थ, कालबाह्य वस्तूंची विक्री किंवा निकृष्ट दर्जाच्या बर्फाचा वापर यामुळे ग्राहकांच्या आरोग्याला धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे प्रशासनाने सुरू केलेल्या कारवाईचे अनेकांनी स्वागत केले आहे.

दरम्यान, अन्न व औषध प्रशासनाकडून सर्व खाद्य व्यवसायिकांना आवश्यक परवाने घेणे, स्वच्छतेचे नियम पाळणे, दर्जेदार कच्चा माल वापरणे आणि अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरणाच्या (एफएसएसएआय) नियमांचे पालन करणे बंधनकारक असल्याचे वारंवार सांगितले जात आहे. नियमांचे पालन करणाऱ्या व्यावसायिकांना कोणतीही भीती बाळगण्याचे कारण नसल्याचेही प्रशासनाच्या वतीने स्पष्ट करण्यात येत आहे.काही व्यापाऱ्यांनी मात्र प्रशासनाच्या वाढत्या कारवाईमुळे व्यवसायिकांमध्ये चिंता निर्माण झाल्याचे सांगितलं. तपासणीदरम्यान कोणतीही त्रुटी आढळू नये यासाठी आवश्यक कागदपत्रे आणि परवान्यांची पूर्तता केली जात असल्याचं त्यांनी नमूद केलं. जिल्ह्यात ज्यूस, आईस्क्रीम आणि शीतपेय विक्री केंद्रे तात्पुरती बंद राहण्यामागे तुकाराम मुंढेंच्या संभाव्य तपासणीची भीती हे प्रमुख कारण असल्याची चर्चा रंगत आहे.

# भारताच्या फिरकीसमोर पाक महिलांची शरणागती

## पाक महिलांचा 64 धावांनी दारूण पराभव, मानधनाचे अर्धशतक, दीप्ती शर्माचे 5, श्रीचरणीचे 3 बळी

**बर्मिंगहॅम, वृत्तसंस्था :**

भारताच्या फिरकी गोलंदाजीसमोर पाक संघाने सपशेल शरणागती पत्करली. 2026 च्या आयसीसी महिलांच्या टी-20 विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत रविवारी खेळविण्यात आलेल्या सामन्यात भारताने पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकचा 64 धावांनी दणदणीत पराभव करत दणकेबाज विजयी सलामी दिली. फिरकी गोलंदाज दीप्ती शर्माने केवळ 10 धावात 5 गडी बाद करून सामनावीराचा बहुमान पटकाविला. तसेच स्मृती मानधनाचे अर्धशतक भारताच्या विजयाला हातभार लावणारे ठरले.



या सामन्यात भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला पण पहिल्या षटकातील 5 व्या चेंडूवर सादिया इक्बालने शेफाली वर्माला 6 धावांवर झेलबाद केले. त्यानंतर तस्मिया रूबाबने रॉड्रीग्सला केवळ एका धावेवर तंबूचा रस्ता दाखविला. स्मृती मानधना आणि कर्णधार हरमनप्रित कौर या जोडीने संघाची बाजू सावरताना तिसऱ्या गड्यासाठी 91 धावांची भागीदारी 63 चेंडूत नोंदविली.

मानधनाने 44 चेंडूत 2 षटकार, 9 चौकारांसह 68 धावा जमविल्या. शमीमने तिला झेलबाद केले. यानंतर सादिया इक्बालने भारती फुलमालीला एका धावेवर बाद केले. कर्णधार हरमनप्रीत कौरने 35 चेंडूत 4 चौकारांसह 36 धावा झळकविल्या. फातिमा सनाने तिला परवेझकरवी झेलबाद केले. भारताची स्थिती यावेळी 16.2 षटकात 5 बाद 123 अशी होती. रिचा घोषने शेवटच्या दोन षटकात केलेल्या फटकेबाजीमुळे भारताला 170 धावापर्यंत मजल मारता आली. रिचा घोषने 17 चेंडूत 1 षटकार व 5 चौकारांसह 34 धावा झोडपल्या. तिने 19 व्या षटकात 1 षटकार आणि 3 चौकारांसह 23 धावा झोडपल्या. रिचा शेवटच्या षटकातील पाचव्या चेंडूवर त्रिफळाचित झाली. दीप्ती शर्माने 9 चेंडूत 1 चौकारासह नाबाद 12, तर श्रेयांका पाटीलने नाबाद 1 धाव केली. भारताच्या डावामध्ये 4 षटकार आणि 19 चौकार नोंदविले गेले. भारताने पॉवरप्ले दरम्यानच्या पहिल्या 6 षटकात 38 धावा जमविताना 2 गडी गमविले. भारताचे अर्धशतक 51 चेंडूत, शतक 77 चेंडूत तर दीडशतक 114 चेंडूत नोंदविले गेले. मानधनाने 34 चेंडूत 1 षटकार आणि 7 चौकारांसह अर्धशतक झळकविले. पाकतर्फे सादिया इक्बाल आणि फातिमा सना यांनी प्रत्येकी दोन तर शमीम आणि रूबाब यांनी प्रत्येकी 1 गडी बाद केला.

प्रत्युत्तरादाखल खेळताना मुनीबा अली आणि फिरोझा यानी पाकच्या डावाला सावध सुरूवात करून देताना 29 चेंडूत 38 धावांची भागीदारी केली. दीप्ती शर्माने फिरोझाला फुलमालीकरवी झेलबाद केले. तिने 9 चेंडूत 2 चौकारांसह 12 धावा केल्या. त्यानंतर दीप्ती शर्माने पाकला आणखी एक धक्का देताना आयेशा जाफरला मानधनाकडे झेल देण्यास भाग पाडले. मानधनाने हा झेल अप्रतिमरित्या घेतला. जाफरने 8 चेंडूत 2 चौकारांसह 12 धावा केल्या. श्रीचरणीने जबीनला 2 धावावर झेलबाद केले. एका बाजूने चिवट फलंदाजी करणारी मुनीबा अली दीप्ती शर्माच्या अचूक फेकीवर धावचीत झाली. तिने 35 चेंडूत 5 चौकारांसह 41 धावा जमविल्या. शेफाली वर्माने कर्णधार फातिमा सनाला खाते उघडण्यापूर्वीच मानधनाकरवी झेलबाद केले. पाकची यावेळी स्थिती 5 बाद 77 अशी होती.

श्रीचरणीने नतालीया परवेझला 7 धावावर झेलबाद केले. भारतीय संघातील हरमनप्रीत कौर आणि स्मृती मानधना यांचे क्षेत्ररक्षण अत्यंत चपळ झाले. कौरने तीन झेल तर मानधनाने दोन झेल टिपले.

**शर्माच्या एका षटकात 3 बळी**

पाकच्या डावातील 17 वे षटक निर्णायक ठरले. दीप्ती शर्माचे चौथे षटक होते. या षटकातील दुसऱ्या चेंडूवर दीप्तीने आलिया रियाजला झेलबाद केले. तिने 17 चेंडूत 1 चौकारासह 18 धावा जमविल्या. दीप्तीने या षटकातील चौथ्या चेंडूवर रूबाबला खाते उघडण्यापूर्वीच रॉड्रीग्सकरवी झेलबाद केले. तर याच षटकातील शेवटच्या चेंडूवर दीप्तीने नशरा संधूला झेलबाद करून पाकचा डाव 17 षटकात 106 धावांत संपुष्टात आणला.

पाकच्या डावामध्ये 10 चौकार नोंदविले गेले. पाकने पहिल्या 6 षटकात 52 धावा जमविताना 1 गडी गमविला. पाकचे अर्धशतक 35 चेंडूत तर शतक 95 चेंडूत नोंदविले गेले. भारतातर्फे दीप्ती शर्माने 10 धावात 5 बळी तर श्रीचरणीने 21 धावात 3 बळी आणि शेफाली वर्माने 22 धावात 1 गडी बाद केला.

**संक्षिप्त धावफलक :** भारत 20 षटकात 6 बाद 170 (स्मृती मानधना 68, हरमनप्रीत कौर 36, रिचा घोष 34, दीप्ती शर्मा नाबाद 12, अवांतर 11, सादिया इक्बाल आणि फातिमा सना प्रत्येकी 2 बळी, तस्मिया रूबाब आणि रमीन शमीम प्रत्येकी 1 बळी), पाकिस्तान 17 षटकात सर्वबाद 106 (मुनीबा अली 41, फिरोझा 12, आयेशा जाफर 12, आलिया रियाज 18, अवांतर 5, दीप्ती शर्मा 5-10, श्रीचरणी 3-21, शेफाली वर्मा 1-22)

# ऑस्ट्रेलियाने टाळला 'व्हाईटवॉश'




**मिरपुर, वृत्तसंस्था :**

यजमान बांगलादेशने बलाढ्य ऑस्ट्रेलियाचा तीन सामन्यांच्या वनडे मालिकेत 2-1 अशा फरकाने पराभव केला. बांगलादेशचा हा ऐतिहासिक मालिका विजय ठरला. या मालिकेतील तिसऱ्या आणि शेवटच्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने बांगलादेशचा 3 चेंडू बाकी ठेऊन एका गड्याने पराभव करत आपला संभाव्य 'व्हाईटवॉश' टाळला. ऑस्ट्रेलियाच्या कुपर कोनोलीला 'सामनावीर' तर बांगलादेशच्या मोसदेक हुसेनला 'मालिकावीर' म्हणून घोषित करण्यात आले.

या शेवटच्या सामन्यात बांगलादेशने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना 50 षटकात 5 बाद 274 धावा जमविल्या. त्यानंतर ऑस्ट्रेलियाने 49.3 षटकात 9 बाद 277 धावा जमवित हा सामना 3 चेंडू बाकी ठेऊन जिंकला.

बांगलादेशच्या डावात रिदॉयने 88 चेंडूत 8 चौकारांसह 83, लिटॉन दासने 78 चेंडूत 2 षटकार आणि 4 चौकारांसह नाबाद 58, मोसदेक हुसेनने 51 चेंडूत 1 षटकार आणि 5 चौकारांसह नाबाद 56, नजमुल हुसेन शांतोने 3 चौकारांसह 24, टी. हसनने 1 षटकार आणि 2 चौकारांसह 19 धावा जमविल्या. सरकार केवळ 2 धावावर बाद झाला. बांगलादेशला 29 अवांतर धावा मिळाल्या. बांगलादेशच्या डावात 4 षटकार आणि 22 चौकार नोंदविले गेले. ऑस्ट्रेलियातर्फे रेन्शॉने 44 धावात 2, तसेच बार्टलेटने 47 धावात 2, इवेरहुईसने 1 गडीबाद केला.

प्रत्युत्तरादाखल खेळताना सलामीचा फलंदाज कुपर कोनोलीच्या दमदार शतकाने ऑस्ट्रेलियाला निसटता विजय मिळाला. कोनोलीने 134 चेंडूत 6 षटकार आणि 13 चौकारांसह 149 धावा, लाबुशेनने 1 चौकारासह 29, ग्रीनने 1 षटकार आणि 1 चौकारासह 27, पिकने 1 षटकार आणि 2 चौकारांसह 27, आणि कर्णधार इंग्लीसने 4 चौकारांसह 21 धावा जमविल्या. ऑस्ट्रेलियाच्या डावात 8 षटकार आणि 23 चौकार नोंदविले गेले. बांगलादेशतर्फे शोरीफुल इस्लामने 48 धावात 6 गडी बाद केले. तस्कीन अहमद, रेहमान आणि मेहदी हसन मिराजने, प्रत्येकी 1 गडीबाद केला.

**संक्षिप्त धावफलक :** बांगलादेश 50 षटकात 5 बाद 274 (रिदॉय 83, मोसदेक हुसेन नाबाद 56, लिटन दास नाबाद 58, शांतो 24, टी. हसन 19, अवांतर 19, बार्टलेट व रेन्शॉ प्रत्येकी 2 बळी,) ऑस्ट्रेलिया 49.3 षटकात 9 बाद 277, (कुपर कोनोली 149, लाबुशेन 29, इंग्लीस 21, ग्रीन 27, पिक 27, शोरीफुल इस्लाम 6-48, टी. अहमद, रेहमान आणि मेहदीहसन मिराज प्रत्येकी 1 बळी.)

# न्यूझीलंडला नमवून विंडीजची विजयी सलामी

**साऊदम्पटन, वृत्तसंस्था :**

2026 च्या आयसीसी महिलांच्या टी-20 विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत विंडीजने विजयी सलामी देताना न्यूझीलंडचा 7 गड्यांनी पराभव केला. या सामन्यात नाबाद 90 धावा जमविणाऱ्या विंडीजच्या शेमेन कॅम्पबेलला 'सामनावीर' म्हणून घोषित करण्यात आले.



या स्पर्धेतील हा चौथा सामना दिवसा-रात्रीचा खेळविण्यात आला. या सामन्यात विंडीजने नाणेफेक जिंकून न्यूझीलंडला प्रथम फलंदाजी दिली. न्यूझीलंडने 20 षटकात 6 बाद 162 धावा जमविल्या. त्यानंतर विंडीजने 19.5 षटकात 3 बाद 163 धावा जमवित हा सामना 1 चेंडू बाकी ठेऊन 7 गड्यांनी जिंकला. न्यूझीलंडच्या डावामध्ये सलामीच्या इसाबेला गेझने 29 चेंडूत 8 चौकारांसह 39 तर सोफी डिव्हाईनने 15 चेंडूत 3 चौकारांसह 22, हॅलिडेने 32 चेंडूत 5 चौकारांसह 40 तर मॅडी ग्रीनने 22 चेंडूत 1 षटकार आणि 4 चौकारांसह नाबाद 35 धावा जमविल्या. गेझ आणि प्लिमेर यांनी सलामीच्या गड्यासाठी 35 चेंडूत 49 धावांची भागिदारी केली. कर्णधार मेली केर केवळ 5 धावांवर बाद झाली. प्लिमेरने 1 चौकारासह 8 धावा जमविल्या. 8 षटकात न्यूझीलंडची स्थिती 3 बाद 56 अशी होती. डिव्हाईन आणि हॅलिडे यांनी चौथ्या गड्यासाठी 45 धावांची भर घातली. न्यूझीलंडच्या डावात 1 षटकार आणि 22 चौकार नोंदविले गेले. न्यूझीलंडने पॉवरप्ले दरम्यानच्या पहिल्या 6 षटकात 49 धावा जमविताना 1 गडी गमाविला. न्यूझीलंडचे शतक 74 चेंडूत तर दीडशतक 115 चेंडूत नोंदविले गेले. विंडीजतर्फे शेमेन ॲलीनने 27 धावांत 4 तर मॅथ्यूज आणि डॉटिन यांनी प्रत्येकी 1 गडी बाद केला.

प्रत्युत्तरादाखल खेळताना विंडीजच्या डावात सलामीची जोसेफ केवळ 2 धावांवर धावचीत झाली. त्यानंतर कर्णधार मॅथ्यूज आणि कॅम्पबेल यांनी दुसऱ्या गड्यासाठी 74 धावांची भागिदारी नोंदविली. मॅथ्यूजने 37 चेंडूत 1 षटकार आणि 6 चौकारांसह 48 तर कॅम्पबेलने 62 चेंडूत 3 षटकार आणि 7 चौकारांसह नाबाद 90 धावा झोडपल्या. डॉटिनने 6 धावा तर क्लेक्स्टोनने नाबाद 6 धावा जमविल्या. विंडीजच्या डावात 4 षटकार आणि 13 चौकार नोंदविले गेले. विंडीजने पॉवरप्ले दरम्यानच्या पहिल्या 6 षटकात 35 धावा जमविताना 1 गडी गमविला. कॅम्पबेलने 39 चेंडूत 2 षटकार आणि 4 चौकारांसह अर्धशतक झळकाविले. विंडीजचे शतक 80 चेंडूत तर दीडशतक 108 चेंडूत फलकावर लागले. न्यूझीलंडतर्फे जेस केरने 17 धावांत 2 गडी बाद केले. **संक्षिप्त धावफलक :** न्यूझीलंड 20 षटकात 6 बाद 162 (हॅलिडे 40, मॅडी ग्रीन नाबाद 35, गेझ 39, डिव्हाईन 22, मेली केर 5, शार्प 5, जेस केर नाबाद 2, अवांतर 6, ॲलेनी 4-27, मॅथ्यूज आणि डॉटिन प्रत्येकी 1 बळी), विंडीज 19.5 षटकात 3 बाद 163 ( शेमेन कॅम्पबेल नाबाद 90, मॅथ्यूज 48, जोसेफ 2, डॉटिन 6, क्लेक्स्टोन नाबाद 6, अवांतर 11, जेस केर 2-17).

# पारुल चौधरीचा नवा राष्ट्रीय विक्रम

**नाईस (फ्रान्स), वृत्तसंस्था :**

शनिवारी येथे झालेल्या 2026 च्या निकिया ॲथलेटिक्स स्पर्धेत भारताची महिला धावपटू पारूल चौधरीने 5000 मी. धावण्याच्या शर्यतीत वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरीची नोंद करीत येथ तिने दुसरे स्थान मिळविले.

या स्पर्धेत तिने या क्रीडा प्रकारात 15 मिनिटे, 0.4.26 सेकंदाचा अवधी नोंदविला. पारूलची या क्रीडा प्रकारातील ही सर्वोत्तम कामगिरी आहे. पारूलला या क्रीडा प्रकारात दुसऱ्या स्थानावर समाधान मानावे लागले होते. इथिओपियाच्या बेरेका सोनिया मोहम्मदने 15 मिनिटे, 03.85 सेकंदाचा अवधी घेत प्रथम स्थान तर फ्रान्सच्या ॲलेसिया झार्बीने 15 मिनिटे, 16.83 सेकंदाचा अवधी घेत तिसरे स्थान मिळविले. पारूलने यापूर्वी या क्रीडा प्रकारात 15 मिनिटे, 10.35 सेकंदाचा राष्ट्रीय विक्रम नोंदविला होता. 2026 च्या ॲथलेटिक हंगामात पारूल चौधरीने शांघाय डायमंड लीग स्पर्धेत 3000 मी. स्टिपलचेस प्रकारात



सातवे स्थान मिळविले होते. तसेच फ्रान्सच्या या स्पर्धेत पारूलने 3000 मी. धावण्याच्या शर्यतीत 8 मिनिटे, 57.19 सेकंदाचा अवधी घेत नवा राष्ट्रीय विक्रम केला.

# विजय – त्रिशा यांनी खरंच गुपचूप उरकला साखरपुडा ? अंगठी आणि गळ्यातील पेंडंटमुळे चर्चांना उधाण..

ता मिळनाडूचे मुख्यमंत्री आणि अभिनेत्री त्रिशा कृष्णन याच्या रिलेशनशिपच्या चर्चांनी सध्या जोर धरला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून दोघांच्या रिलेशनशिपच्या चर्चा रंगत आहेत. पण दोघांनी देखील यावर अद्याप अधिकृत घोषणा केलेली नाही. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे, दोघांच्या रिलेशनशिपच्या चर्चांनी आणखी जोर धरला जेव्हा, मुख्यमंत्री शपथ विधी सोहळ्याला त्रिशा उपस्थितीत होती. एवढंच नाही तर, विजय यांच्या कुटुंबियांसोबत अभिनेत्रीचे अनेक फोटो आणि व्हिडीओ देखील व्हायरल झाले. आता दोघांनी गुपचूप साखरपुडा उरकला असल्याच्या चर्चांनी देखील जोर धरला आहे. सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या फोटोंमुळे साखरपुड्या चर्चांना उधाण आलं आहेविजय आणि त्रिशा एकमेकांना डेट करत असल्याच्या चर्चा सुरू असतानाच, एका व्हायरल फोटोमुळे त्यांच्या गुपचूप साखरपुड्याबाबत तर्क-वितर्क लावले जात आहेत. या फोटोमध्ये त्रिशाने पिंपळाच्या पानाचा आकार असलेले लॉकेट असलेला एक नवीन हार





घातलेला दिसत आहे; हे लॉकेट लग्नावेळी पारंपरिकरीत्या घातल्या जाणाऱ्या पवित्र पेंडंट्ससारखं दिसत आहे. त्यामुळे, यामुळे त्यांच्या साखरपुड्यावर किंवा लग्नावर शिक्कामोर्तब झाले आहे का, असा प्रश्न चाहत्यांना पडला आहे.सांगायचं झालं तर, व्हिडीओ आताचा नाही, तर फार जुना आहे... हा व्हिडीओ तेव्हाचा आहे, जेव्हा त्रिशा 'ठग लाईल' सिनेमाच्या प्रमोशनसाठी आलेली. विजय यांच्या खासगी आयुष्याबद्दल सांगायचं झालं तर, संगीता यांनी घटस्फोटासाठी कोर्टात अर्ज दाखल केला आहे... त्यांनी विजय यांच्यावर गंभीर आरोप करत घटस्फोट घेण्याचा निर्णय घेतला आहे..विजय यांचं एक अभिनेत्रीसोबत गेल्या अनेक वर्षांपासून अफेअर आहे... मी त्यांना अनेकदा संधी दिली. पण त्यांनी कुटुंबाला प्राधान्य दिलं नाही... असं संगीता यांनी कोर्टात अर्ज दाखल करत म्हटलं आहे. विजय यांच्या पत्नीने आरोप केल्यानंतर विजय आणि त्रिशा यांच्या अफेअरच्या चर्चांनी जोर धरला. पण यावर अद्याप दोघांनी देखील अधिकृत घोषणा केलेली नाही.

त्रिशा हिच्या प्रोफेशनल आयुष्याबद्दल सांगायचं झालं तर, अभिनेत्री 'करुप्पु' सिनेमाच्या माध्यमातून चाहत्यांच्या भेटीस आलेली. सिनेमा बॉक्स ऑफिसवर देखील दमदार कमाई केली. सिनेमा आता ओटीटी प्लॅटफॉर्मवर देखील प्रदर्शित झाला आहे. त्रिशा सोशल मीडियावर देखील कायम सक्रिय असते. सोशल मीडियावर तिच्या चाहत्यांची संख्या देखील फार मोठी आहे.

## माधुरीचं २८ वर्ष जुनं गाणं... रस्त्यावरून लोकांना उचललं, शर्ट उडवताच बनलं कल्ट...

बॉलिवूडमध्ये असंख्य गाणी आहेत. अविट गोडीची, रसाळ आणि मधाळ. यातील प्रत्येक गाण्याची गोडी काही औरच आहे. आजही असंख्य गाणी लोक गुणगुणत असतात. पण काही गाणी अशी असतात की त्याला तोडच नाही. 90च्या दशकानेही अशीच गाणी दिली. पण त्यातील एक गाणं आजही कल्ट गाण्यात समाविष्ट आहे. आपल्या मराठमोळ्या माधुरीचं हे गाणं. माधुरी दीक्षितच्या 90च्या दशकातील या गाण्याची जादू आजही कायम आहे. त्या काळात तर या गाण्यावर लोक ठेका धरायचे. गाण्याचे बोल, संगीत आणि माधुरीच्या डान्स स्टेप्सने तर कहरच उडवला होता. त्यातल्या माधुरीच्या आदा तर लय भारी. विशेष म्हणजे हे गाणं त्या काळातील आयटम नंबर होतं. आज 28 वर्षानंतरही हे गाणं हिट आहे. सर्वात महत्त्वाचं म्हणजे या गाण्यात नाचण्यासाठी रस्त्यावरून उचलून लोकांना आणलं होतं.माधुरी दीक्षितचा मां बहन हा सिनेमा सध्या चर्चेत आहे. ओटीटी प्लॅटफॉर्म नेटफिलिक्सवर हा सिनेमा रिलीज होणार आहे. या सिनेमाला लोकांची चांगली पसंती मिळत आहे. या सिनेमात तृप्ती डिमरी आणि रवी किशन हे स्टार्सही आहेत. या सिनेमाच्या प्रमोटिंगसाठी माधुरी एका पॉडकास्टला गेली होती. त्यावेळी तिने 28 वर्ष जुन्या तिच्या एक दोन तीन या गाण्यावरही भाष्य केलं होतं.माधुरीने या गाण्याचे किस्से सांगितले. माधुरी म्हणाले, मेकर्सला टॉप शॉर्ट हवा होता. तर काय करायचं? असा प्रश्न पडला.



त्यावेळी रस्त्यावरून लोकांना उचलायचं असं ठरलं. मग रस्त्यावर काही लोक उभे राहिले आणि जो मिळेल त्याला तुम्ही सिनेमात काम करणार का? अशी विचारणा सुरू झाली. होकार मिळताच, या आत असं म्हणत आतमध्ये घेतलं. असं करत करत असंख्य लोकांना रस्त्यावरून उचलून शुटिंग स्थळी आणलं. आणि या लोकांनी गाण्यात डान्स केला. हे लोक ज्युनिअर आर्टिस्ट नव्हते. सामान्य लोक होते. त्यातील एकाने तर गाणं सुरू असतानाच आपल्या अंगातील शर्ट काढून हवेत उडवली होती.हवेत शर्ट उडवणारा व्यक्ती अधिकच एक्साईट झाला होता. तो ज्युनिअर आर्टिस्ट नव्हता. असाच एक व्यक्ती होता. एन. चंद्रा यांनी हा प्रकार पाहिला आणि म्हणाले अरे मला हे खूप आवडलं.

## उर्मिला मातोंडकरचा एक्सनं केलं दुसरं लग्न

उर्मिला मातोंडकर आणि मोहसिन अख्तर यांनी २०१६ मध्ये लग्न केलं आणि २०२४ मध्ये घटस्फोट घेतला. आता, अभिनेत्री उर्मिलाचा एक्स पती त्याच्या दुसऱ्या लग्नामुळे चर्चेत आहे. उर्मिलापासून विभक्त झाल्यानंतर जवळपास दोन वर्षांनी, उद्योगपती आणि मॉडेल मोहसिननं निधा भट्टशी लग्न केलं. त्यानं आपल्या दुसऱ्या पत्नीसोबत नवीन आयुष्याला सुरुवात केली आहे. मोहसिननं आपल्या पत्नीसोबतचे लग्नाचे काही फोटो सोशल मीडियावर शेअर करत ही आनंदाची बातमी चाहत्यांसोबत शेअर केली.रविवार, १४ जून २०२६ रोजी, मोहसिननं सोशल मीडियावर लग्नाचे काही फोटो शेअर केले. फोटोंसोबतच, त्यानं एक भावनिक पोस्ट लिहिली. या पोस्टमध्ये त्यानं प्रेमाबद्दल आणि आपल्या पत्नीसोबतच्या नवीन प्रवासाबद्दल लिहिलंयचांगला हेतू, खरं प्रेम, संयम आणि कृतज्ञतेनं भरलेलं हृदय. आपलं मन शुद्ध ठेवा. अल्लाह नेहमी आपल्या चांगल्याचाच विचार करतो. योग्य वेळी, अल्लाहनं माझी



प्रिय पत्नी, निधाला माझ्या आयुष्यात पाठवलं. तू माझं आयुष्य प्रकाशमय केलं आहेस. म्हणून धन्यवाद.'मोहसिनने पोस्टमध्ये पुढे लिहिलं, 'आणि मौजी, या जगात माझी काळजी घेतल्याबद्दल धन्यवाद. मला माहित आहे की, तुमच्या प्रार्थना आणि माझ्यावरील प्रेमामुळेच मला सगळं काही मिळालं आहे. आज, मला खात्री आहे की, तुम्ही आनंदी आहात. मला तुमची आठवण येते. माझं तुमच्यावर खूप प्रेम आहे.'दरम्यान, मोहसिन अख्तर आणि उर्मिला मातोंडकर यांनी २०१६ मध्ये लग्न केलं. मोहसिन एक काश्मिरी व्यावसायिक आणि मॉडेल आहे. तो उर्मिलापेक्षा ९-१० वर्षांनी लहान होता, त्यामुळे त्यांच्या लग्नाच्या चर्चा झाल्या. उर्मिला आणि मोहसिन २०२४ मध्ये विभक्त झाले.

## हिंदी सिनेमात काम केलं म्हणजे त्यानं मोठं काहीतरी मिळवलं असं नाही : गिरिजा ओक



गेल्या काही काळामध्ये अभिनेत्री गिरिजा ओक हिची विविध भाषांमधील आणि वेगवेगळ्या माध्यमातील कामं गाजली. 'नॅशनल क्रश' अशी नवी ओळख मिळवलेली गिरिजा आता कोणत्या कलाकृतीत झळकणार याकडे तिच्या चाहत्यांचं लक्ष लागलेलं असतं. लवकरच ती मुख्य भूमिकेत असलेला ' भारत भाग्य विधाता ' हा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. मुंबईवर २६/११ रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यादरम्यान कामा रुग्णालयात झालेल्या धुमश्चक्रीचं चित्रण करण्यात आलं आहे.प्रत्येक कलाकृती कलाकाराला आणि त्यातील माणसाला खूप काही देऊन जाते, 'भारत भाग्य विधाता' या कलाकृतीनं तुला काय दिलं? असं विचारलं असता गिरिजा सांगते, 'वेगवेगळ्या भूमिकांमधून परकाया प्रवेश करायला मिळणं, समाजासाठी झटणाऱ्या मंडळींची व्यक्तिरेखा साकारायला मिळणं, हे मी माझं भाग्य समजते. अभिनयामुळे थोड्या वेळासाठी त्यांचं आयुष्य अनुभवता येतं. 'भारत भाग्य विधाता' या सिनेमामुळे परिचारिकांचं आयुष्य जगता आलं. कामा रुग्णालयात दहशतवादी हल्ला झाल्यानंतर त्या परिचारिका लगेच दुसऱ्या दिवशी रुग्णसेवा करण्यास सज्ज होत्या, या प्रसंगानं एक शिकवण दिली, ती म्हणजे एका घटनेनं आयुष्य तिथंच थांबत नाही. त्या पुन्हा उभ्या राहिल्या. ही मला मिळालेली मोठी शिकवण आहे'.मराठी कलाकारांना हिंदी सिनेसृष्टीत काम मिळणं, त्यांना तिथं ओळख मिळणं, ही प्रक्रिया मला कधीच सोपी किंवा अवघड वाटली नाही. संधी मिळते तसं ते घडत जातं. एखाद्या कलाकारानं एक काम केलं की, त्यातून दुसरं काम मिळतं. कलाकाराचं एक काम त्याला दुसरं काम मिळवून देत असतं. तुम्ही प्रेक्षकांना सारखे सारखे दिसत राहिलात किंवा पार्ट्यांमध्ये सहभागी झालात तरच काम मिळतं असं नाही. कामातून काम मिळतं. लोकांच्या पसंतीस उतरेल असं एक काम मिळणं आवश्यक असतं. ते झालं की, दुसऱ्या कामासाठी विचारणा होते आणि मग कलाकाराचा त्या भाषेतला प्रवास सुरू होतो', अशा शब्दांत गिरिजा मराठी कलाकारांना हिंदी कलाकृतींमध्ये काम मिळण्याच्या प्रक्रियेविषयी व्यक्त झाली.मराठी कलाकाराला हिंदी सिनेमांमध्ये काम मिळणं म्हणजे त्यानं यशाचा पुढचा टप्पा पार केला, असं समजणं मला पटत नाही. हिंदी सिनेमात काम केलं म्हणजे त्यानं मोठं काहीतरी मिळवलं, असं महत्त्व आपणच वाढवून ठेवलं आहे. इतर भाषांमधील कामाशी तुलना करणं चुकीचं आहे. काम चांगलं करणं, हेच कोणत्याही कलाकाराचं ध्येय असलं पाहिजे', अशा स्पष्ट शब्दांत गिरिजा व्यक्त झाली.

# अखेर मादणी येथील तो धोकादायक खड्डा बुजला; पण साहेब, फक्त माती टाकून काय होणार?



**जनसंचलन/ डोणगाव**

केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांच्या गावाजवळील मादणी ते वडजी मार्गावर रस्ता खचून निर्माण झालेल्या जीवघेण्या खड्ड्याबाबत हॅलो बुलढाणा ने आवाज उठवताच अखेर प्रशासनाला जाग आली. बातमीचा इम्पॅक्ट होत सार्वजनिक बांधकाम विभागाने धोकादायक ठिकाणी माती टाकून खड्डा बुजवण्याची कार्यवाही केली. मात्र आता ग्रामस्थांनी थेट सवाल उपस्थित केला आहे की साहेब, फक्त माती टाकून काय होणार? मागील वर्षीच्या मुसळधार पावसात या रस्त्याचा मोठा भाग वाहून गेला होता. वर्षभर वाहनचालक, शेतकरी, विद्यार्थी आणि नागरिक जीव मुठीत धरून प्रवास करत होते. ना इशारा फलक, ना बॅरिकेड्स, ना कायमस्वरूपी दुरुस्ती; प्रशासन मात्र ढिम्म होते. हॅलो बुलढाणा ने यावर बातमी प्रसिद्ध केल्यानंतरच हालचाल सुरू झाली आणि खड्डा बुजवण्यात आला. परंतु नागरिकांच्या मते ही केवळ तात्पुरती मलमपट्टी आहे. कोट्यवधी रुपये खर्च करून तयार केलेला रस्ता दोन-तीन वर्षांतच खचतो, याचा अर्थ कामाच्या दर्जावर गंभीर प्रश्नचिन्ह आहे. अशा ठिकाणी केवळ माती टाकून धोका टळणार नाही. पावसाळा तोंडावर असताना ही माती पुन्हा वाहून गेली, तर पुन्हा अपघाताचा धोका निर्माण होणार नाही का? विशेष म्हणजे हा मार्ग केंद्रीय मंत्र्यांच्या गावाशी संबंधित असल्याने प्रशासनाने अधिक गांभीर्याने दखल घेणे अपेक्षित होते. ग्रामस्थांनी या रस्त्याची तांत्रिक तपासणी करून कायमस्वरूपी मजबुतीकरण, संरक्षण भिंत, पाणी निचरा व्यवस्था आणि डांबरीकरण करण्याची मागणी केली आहे.

# आरोग्य कर्मचाऱ्यांचे कौशल्यवर्धन; दोन दिवसीय प्रशिक्षणाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**जनसंचलन/बुलढाणा**

राज्य शासनाच्या निर्देशानुसार नागरिकांना गुणवत्तापूर्ण व सर्वसमावेशक आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने प्राथमिक आरोग्य केंद्र पाडळी, ता. बुलढाणा येथे ङ्कङ्कसर्वसमावेशक प्राथमिक आरोग्य सेवाफ्फ या विषयावरील दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमास उत्साहपूर्ण वातावरणात प्रारंभ झाला. आरोग्य व कल्याण केंद्रांमार्फत पुरविण्यात येणाऱ्या सेवांची गुणवत्ता वाढविणे, प्राथमिक आरोग्य सुविधांचा विस्तार करणे तसेच विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करणे हा प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश आहे. दि. १५ ते १६ जून २०२६ या कालावधीत हे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व आरोग्यवर्धिनी केंद्रांसाठी वर्षभराचा प्रशिक्षण आराखडा तयार करण्यात आला असून त्यानुसार आशा कर्मचारी, आरोग्य कर्मचारी तसेच अधिकारी वर्गाचे टप्प्याटप्प्याने प्रशिक्षण घेण्यात येणार आहे. प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते, जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. मिलिंद जाधव, जिल्हा प्रशिक्षण केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. निलेश जाधव, प्राथमिक आरोग्य केंद्र पाडळीचे वैद्यकीय अधिकारी, प्रशिक्षक तसेच जिल्हास्तरीय कार्यक्रम अधिकारी उपस्थित होते. या प्रशिक्षणात वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी (सीएचओ), आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, गटप्रवर्तक आणि आशा समन्वयक सहभागी झाले आहेत. प्रशिक्षणादरम्यान सर्वसमावेशक प्राथमिक आरोग्य सेवा, विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम, समुदाय आधारित आरोग्य सेवा, रुग्णाभिमुख सेवा वितरण, आरोग्य नोंद व्यवस्थापन तसेच आरोग्य व कल्याण केंद्रांच्या कार्यक्षमतेविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात येत आहे. तज्ज्ञ मार्गदर्शकांकडून विविध विषयांवर सादरीकरणे, चर्चासत्रे आणि प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले असून सहभागी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. प्रशिक्षणातून प्राप्त होणारे ज्ञान व कौशल्य ग्रामीण भागातील नागरिकांना अधिक दर्जेदार, सुलभ आणि लोकाभिमुख आरोग्य सेवा देण्यासाठी उपयुक्त ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला. या दोन दिवसीय प्रशिक्षणामुळे आरोग्य विभागातील मनुष्यबळ अधिक सक्षम होऊन सर्वसमावेशक प्राथमिक आरोग्य सेवांच्या प्रभावी अंमलबजावणीला गती मिळेल, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

# डोणगावात छाप्याच्या अफवेने व्यापाऱ्यांची धावाधाव; दोन तास बाजारपेठ ठप्प!




**जनसंचलन/बुलढाणा**

अन्न व पुरवठा विभागाचे अधिकारी तपासणी व कारवाईसाठी डोणगावात येत असल्याच्या अफवेने सोमवारी बाजारपेठेत चांगलीच खळबळ उडाली. ही चर्चा वाऱ्यासारखी पसरताच काही व्यापाऱ्यांच्या पायाखालची वाळू सरकली आणि त्यांनी घाईघाईने दुकाने, पानटपऱ्या बंद करण्यास सुरुवात केली. नेहमी गजबजणारी बाजारपेठ काही मिनिटांतच ओस पडली. विशेष म्हणजे, काही दुकानदारांनी दुकानात असलेल्या ग्राहकांनाही बाहेर काढून थेट शटर खाली ओढल्याचे पाहायला मिळाले. त्यामुळे खरेदीसाठी आलेल्या नागरिकांची मोठी गैरसोय झाली. छापा पडणार या एका चर्चेने व्यापाऱ्यांमध्ये एवढी भीती का पसरली? असा सवाल आता नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे. नियमाने व्यवसाय करणाऱ्यांना तपासणीची भीती नसावी; मग एवढी धावाधाव नेमकी कशासाठी? अशी उलटसुलट चर्चा बाजारपेठेत रंगली. सुमारे दोन तासांनी ही केवळ अफवा असल्याचे स्पष्ट होताच व्यापाऱ्यांनी सुटकेचा श्वास सोडला आणि दुकाने पुन्हा सुरू झाली. मात्र या प्रकाराने डोणगाव बाजारपेठेत पारदर्शक व्यवहारांचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे.

# स्वाधार योजनेसाठी शासकीय वसतिगृह प्रवेश अर्ज बंधनकारक

**जनसंचलन/बुलढाणा**

अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेच्या नियमांमध्ये महत्त्वपूर्ण बदल करण्यात आला असून, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रथम शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज करणे बंधनकारक करण्यात आले आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या निर्देशानुसार, गुणवत्तेनुसार अथवा जागेअभावी ज्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळणार नाही, त्यांनाच स्वाधार योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र मानले जाईल. मात्र, वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज न करणारे विद्यार्थी शासकीय वसतिगृह तसेच स्वाधार योजना या दोन्ही सुविधांपासून वंचित राहू शकतात. मागील परीक्षेत किमान ५० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवलेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांना स्वाधार योजनेसाठी पात्रता राहणार आहे. ज्या तालुक्यांमध्ये शासकीय वसतिगृहे उपलब्ध नाहीत, तेथे या नियमात शिथिलता असली तरी विद्यार्थ्यांनी भविष्यातील अडचणी टाळण्यासाठी अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. शैक्षणिक सत्र २०२६-२७ साठी मुला-मुलींच्या शासकीय वसतिगृह प्रवेशाची ऑनलाइन प्रक्रिया १० जून २०२६ पासून सुरू झाली आहे. विद्यार्थ्यांनी विहित मुदतीत ऑनलाइन अर्ज सादर करणे आवश्यक आहे. इयत्ता ८ वी ते १० वी (शालेय विभाग) ३० जून २०२६ पर्यंत तर इयत्ता ११ वी व १२ वी (कनिष्ठ महाविद्यालय) १५ जुलै तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी दि. १५ जुलै २०२६ पर्यंत अर्ज करण्याची मुदत देण्यात आली आहे.

पत्रकारीतेचा धर्म
आम्ही निभावणार
हॅलो बुलडाणा
सिटी न्यूज टीव्ही & सोशल चॅनल
वेब साईड & पोर्टल चॅनल
वृत्त पेपर हार्ड कॉपी सह - ई पेपर
कुठली ही बातमी निशुल्क
***
दैनिक निडर निर्भिड
जनसंचलन
काही तक्रार असल्यास संपर्क
शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स, कारंजा चौक बुलडाणा मो.9822720784,9373359040
पिन 443001

# कर्जमाफी नव्हे, ही तर कर्जवसुलीची OTS योजना!

## सरसकट कर्जमुक्ती व हक्काच्या पीकविम्यासाठी रविकांत तुपकर आमरण अन्नत्यागावर

जनसंचलन/बुलढाणा

राज्य सरकारने मोठा गाजावाजा करत जाहीर केलेली कर्जमाफी योजना प्रत्यक्षात शेतकऱ्यांची फसवणूक करणारी ङ्कवन टाईम सेटलमेंटफ्र योजना असल्याचा गंभीर आरोप करत क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे नेते रविकांत तुपकर यांनी आजपासून बुलढाणा येथील त्यांच्या निवासस्थानासमोर आमरण अन्नत्याग आंदोलनाला सुरुवात केली आहे. या आंदोलनामुळे जिल्ह्यासह राज्यातील शेतकरी प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. सरकारने शेतकऱ्यांना दिलासा देण्याच्या नावाखाली अटी, निकष आणि कागदी घोळ निर्माण करून खऱ्या अर्थाने कर्जमाफीपासून शेतकऱ्यांना दूर ठेवले आहे, असा आरोप तुपकर यांनी केला. ही कर्जमाफी नसून कर्जवसुलीची योजना आहे. शेतकऱ्यांना सरसकट, विनाअट आणि विनानिकष कर्जमुक्ती मिळालीच पाहिजे. तसेच हक्काचा पीकविमा मिळेपर्यंत मी अन्नाचा एक कणही ग्रहण करणार नाही,फ्र अशी ठाम भूमिका त्यांनी घेतली. तुपकर यांनी यापूर्वी विविध आंदोलनांच्या माध्यमातून सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला; मात्र सरकारने शेतकऱ्यांच्या जखमेवर फुंकर घालण्याऐवजी केवळ घोषणा आणि आश्वासनांचा खेळ सुरू ठेवल्याचा आरोप त्यांनी केला. त्यामुळे आता हा लढा निर्णायक टप्प्यात पोहोचला असून, शेतकऱ्यांच्या न्यायासाठी जीवाची बाजी लावण्याची वेळ आली आहे, असे तुपकर यांनी स्पष्ट केले. एकतर सरकार झुकेल किंवा आम्ही शेतकरी; पण सरसकट कर्जमुक्ती आणि हक्काचा पीकविमा मिळाल्याशिवाय संघर्ष थांबणार नाही,फ्र असा थेट इशारा रविकांत तुपकर यांनी दिला. महाराष्ट्रातील तमाम शेतकऱ्यांनी या लढ्यात सहभागी होण्याचे आवाहनही त्यांनी केले आहे. या आमरण अन्नत्याग आंदोलनामुळे राज्य सरकारवर दबाव वाढण्याची शक्यता आहे.




# जागतिक रक्तदाता दिन उत्साहात साजरा...

## ५० हून अधिक वेळा रक्तदान करणाऱ्या रक्तदात्यांचा गौरव

## प्रभात फेरीतून जनजागृती...

जनसंचलन/बुलढाणा

जिल्हा रुग्णालय व राजमाता जिजाऊ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने ङ्कजागतिक रक्तदाता दिनफ उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. रक्तदानाविषयी जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या प्रभात फेरीस नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. रक्तदान हेच जीवनदानफ हा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी आयोजित प्रभात फेरीला प्रमुख उपस्थिती लाभलेले डॉ. अजित शिरसाठ यांनी हिरवी झेंडी दाखवून प्रारंभ केला. फेरीदरम्यान रक्तदानाचे महत्त्व, सुरक्षित रक्तसाठ्याची गरज आणि स्वेच्छा रक्तदानाचे फायदे याबाबत जनजागृती करण्यात आली. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे समाजहितासाठी आणि गरजू रुग्णांचे प्राण वाचविण्यासाठी सातत्याने ५० पेक्षा अधिक वेळा स्वेच्छेने रक्तदान करणाऱ्या आदर्श रक्तदात्यांचा प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. त्यांच्या सामाजिक बांधिलकीचा गौरव करत उपस्थितांनी त्यांचे अभिनंदन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी नियमित रक्तदानाचे महत्त्व अधोरेखित करत रक्तदाते हे समाजातील खरे जीवनदाते असल्याचे सांगितले. रक्तदानामुळे अनेक रुग्णांना नवजीवन मिळत असून प्रत्येक निरोगी नागरिकाने रक्तदानासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी रक्त संक्रमण अधिकारी डॉ. कविता पवार, डॉ. मिहीर बेदमुथा, रक्तपेढी वैज्ञानिक अधिकारी गौरव कुलकर्णी, विष्णू मुंढे, तांत्रिक पर्यवेक्षक विनोद झगरे, रक्तपेढी तंत्रज्ञ आकाश जाधव, प्रिती साळोखे, शितल इंगळे तसेच समुपदेशक आकाश हिवाळे, धनंजय गोतमारे आणि कक्षसेवक सरला सपकाळ यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समुपदेशक अर्चना जाधव यांनी केले. या प्रसंगी वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी, रक्तदाते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# आरोग्य कर्मचाऱ्यांचे कौशल्यवर्धन; दोन दिवसीय प्रशिक्षणाला उत्स्फूर्त प्रतिसाद

जनसंचलन/बुलढाणा

राज्य शासनाच्या निर्देशानुसार नागरिकांना गुणवत्तापूर्ण व सर्वसमावेशक आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने प्राथमिक आरोग्य केंद्र पाडळी, ता. बुलढाणा येथे सर्वसमावेशक प्राथमिक आरोग्य सेवाफ्र या विषयावरील दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमास उत्साहपूर्ण वातावरणात प्रारंभ झाला. आरोग्य व कल्याण केंद्रांमार्फत पुरविण्यात येणाऱ्या सेवांची गुणवत्ता वाढविणे, प्राथमिक आरोग्य सुविधांचा विस्तार करणे तसेच विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करणे हा प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश आहे. दि. १५ ते १६ जून २०२६ या कालावधीत हे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व आरोग्यवर्धिनी केंद्रांसाठी वर्षभराचा प्रशिक्षण आराखडा तयार करण्यात आला असून त्यानुसार आशा कर्मचारी, आरोग्य कर्मचारी तसेच अधिकारी वर्गाचे टप्प्याटप्प्याने प्रशिक्षण घेण्यात येणार आहे. प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते, जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. मिलिंद जाधव, जिल्हा प्रशिक्षण केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. निलेश जाधव, प्राथमिक आरोग्य केंद्र पाडळीचे वैद्यकीय अधिकारी, प्रशिक्षक तसेच जिल्हास्तरीय कार्यक्रम अधिकारी उपस्थित होते. या प्रशिक्षणात वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी (सीएचओ), आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, गटप्रवर्तक आणि आशा समन्वयक सहभागी झाले आहेत. प्रशिक्षणादरम्यान सर्वसमावेशक प्राथमिक आरोग्य सेवा, विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम, समुदाय आधारित आरोग्य सेवा, रुग्णाभिमुख सेवा वितरण, आरोग्य नोंद व्यवस्थापन तसेच आरोग्य व कल्याण केंद्रांच्या कार्यक्षमतेविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात येत आहे. तज्ज्ञ मार्गदर्शकांकडून विविध विषयांवर सादरीकरणे, चर्चासत्रे आणि प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले असून सहभागी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. प्रशिक्षणातून प्राप्त होणारे ज्ञान व कौशल्य ग्रामीण भागातील नागरिकांना अधिक दर्जेदार, सुलभ आणि लोकाभिमुख आरोग्य सेवा देण्यासाठी उपयुक्त ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला. या दोन दिवसीय प्रशिक्षणामुळे आरोग्य विभागातील मनुष्यबळ अधिक सक्षम होऊन सर्वसमावेशक प्राथमिक आरोग्य सेवांच्या प्रभावी अंमलबजावणीला गती मिळेल, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८